दैनिक
MAHILA SANVAD
# महिला संवाद
आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा
संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड
PUNE : Volume No. 1, Issue No. 305, Marathi Daily Wednesday, Date - 17 June 2026 Price 2 Rupees, Pages - 4
पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक ३०५ वा | मराठी दैनिक | बुधवार दि. १७ जून २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**
जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.
सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.
**महिला संवाद**
कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

# तांदळाच्या डब्यात लपला होता मृत्यू

**मुंबई । प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी मुंबईत कलिंगड खाल्ल्याने कुटुंबातील सर्वच सदस्यांचा मृत्यू झाला होता. तपासानंतर त्या कलिंगडमध्ये उंदीर मारण्याच्या औषधासाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनाचा अंश असल्याचे समोर आले होते. दरम्यान, आता अशाच प्रकारची धक्कादायक घडना घडली आहे. मुंबईतील गिरगाव येथील दोन वर्षांची चिमुरडी सध्या मृत्यूशी झुंज देत असून तिची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. तांदळाच्या डब्यात उंदीर आणि कीटकांपासून संरक्षणासाठी ठेवलेल्या 'ल्युमिनियम फॉस्फाइड' या विषारी कीटकनाशकाच्या वासामुळे तिला विषबाधा झाल्याची शक्यता डॉक्टरांनी व्यक्त केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार संबंधित मुलीला १५ तासांच्या कालावधीत तब्बल तीन वेळा हृदयविकाराचा झटका (कार्डियाक अरेस्ट) आला आहे. गंभीर अवस्थेत तिला हाजी अली येथील एनएच एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून सध्या ती ॲडव्हान्स लाईफ सपोर्टवर आहे. दोन दिवसांपासून तिला उलट्या आणि जुलाब होत होते. यामुळे मुलीला गंभीर निर्जलीकरण झाले होते. मुलीच्या मोठ्या बहिणीलाही त्याच काळात उलट्या आणि जुलाबाचा त्रास झाला होता, मात्र ती दोन दिवसांत बरी झाली होती.

मुलीच्या नातेवाईकांपैकी एका डॉक्टरांनी घरातील तांदळाच्या साठवणुकीत ल्युमिनियम फॉस्फाइडच्या पुड्या ठेवण्यात आल्याची माहिती दिली आहे. या पुड्या ठेवल्यानंतर घरात तीव्र वास येत होता. त्यानंतरच दोन्ही मुलांना त्रास सुरू झाल्याचे समोर आले आहे. या घटनेप्रकरणी पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

हे प्रकरण समोर आल्यानंतर कामा हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ तुषार पालवे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ल्युमिनियम फॉस्फाइडच्या अनेक गोळ्या या तांदळाच्या डब्यात ठेवण्यासाठी वापरल्या होत्या. फॉस्फाइड हे खूप घातक असते.




फॉस्फाइडमुळे त्रास होतो. माणसाला धाप लागते. त्यामळे हगवण लागते. हाच त्रास दोन्ही बहिणींना सोबत झाला होता. आता मोठ्या बहिणीची प्रकृती चांगली आहे, अशी माहिती तुषार पालवे यांनी दिली.

तसेच, काही मिलीग्रॅण फॉस्फाइड जरी शरीरात गेले तरी ते घातक असते. १५० मिली ३०० मिलीग्रॅम फॉस्फाइडमुळे मोठ्या व्यक्तीचादेखील मृत्यू होऊ शकतो. सध्या उपचार सुरू अससलेल्या मुलीला बाहेरुन ऑक्सिजन दिला जातोय. तिच्या किडनीवरदेखील परिणाम झाला आहे. तिला किडनी फेल्यूअर झाले आहे. तिचा ब्रेन डॅमेज झाला नसेल तर ती यातून बाहेर येऊ शकते, अशी माहितीही त्यांनी दिली. तसेच फॉस्फाइडहे डब्यात ठेवल्यामुळे त्याच्या वाफा तयार झाल्या. आपण जेव्हा अश्या गोष्टी घरात ठेवतो तेव्हा त्यापासून लहान मुलांना दूर ठेवावे, असा सल्लादेखील त्यांनी दिला.

**पाहिजेत**
महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.
अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३
संपर्क - 9168567111
वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

## थोडक्यात...

### मुंबईतील पावसाळापूर्व तयारीचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतला आढावा

**मुंबई । प्रतिनिधी**

पावसाळ्यात मुंबई आणि महानगर परिसरात शून्य जिवितहानी हे उद्दिष्ट ठेवून यंत्रणांनी समन्वयातून काम करावे. यंदा पाऊस लांबणीवर पडल्याने आपत्ती नियंत्रणासोबतच पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्याची आवश्यकता आहे. नालेसफाई सोबतच होल्डींग पाँड, दरडप्रवण क्षेत्रात संरक्षण जाळी बसवणे, होर्डींग्जचे स्ट्रक्चरल ऑडीट करावे. एनडीआरएफच्या धर्तीवर मुंबई महापालिकेने आपत्ती प्रतिसाद दल तयार करावेत, असे निर्देश देतानाच प्रशासकीय यंत्रणांनी टीम म्हणून काम करून पावसाळ्यात मुंबईकरांना दिलासा देण्याचे काम करावे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले.

दरम्यान, मुंबईतील २००० किमी पैकी १७०० किमी लांबीच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण पूर्ण झाले असून रस्ते आणि खड्डे दुरूस्तीचा ८० टक्के खर्च कमी झाल्याची माहितीही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिली. मुंबई आणि परिसरातील पावसाळापूर्व कामांचा आढावा घेणारी बैठक उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून घेतली. यावेळी मुंबईच्या महापौर रितु तावडे, उपमहापौर संजय घाडी, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त, रेल्वे, पोलिस, सिडको, म्हाडा, एमएमआरडीए, एसआरए, तटरक्षक दल, नौसेना, एनडीआरएफ, बेस्ट विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, मुंबई महापालिकेसह अन्य विभागांनी केलेले नियोजन मुंबईकरांना दिलासा देण्यासाठी उपयुक्त ठरणार असून अजून ज्या भागात नालेसफाईचे काम पूर्ण झाले नाही तेथे सफाईचे काम तातडीने पूर्ण करून घ्यावे. पाऊस लांबल्याने यंत्रणांना तयारीसाठी अतिरिक्त वेळ मिळाला आहे. होल्डींग पाँड, फ्लड गेट कार्यरत करावे. बेस्ट, एसटी ने पर्यायी वाहतुक व्यवस्थेचे नियोजन करावे. झाड कोसळून दुर्घटना होण्याचे प्रमाण रोखण्यासाठी महापालिकेने अदिकची दक्षता घेतली पाहिजे. रेल्वेने रेल्वे ट्रॅकखालच्या नाल्यांची सफाई योग्य पद्धतीने करावी. झोपडपट्टीभागाताली पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने झाल्यास त्या भागात जलजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यास मदत होणार आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यामध्ये औषधांचा साठा करून ठेवावा. मेट्रो स्थानकांमध्ये पाणी साचणार नाही याची खबरदारी घ्यावी. एनडीआरएफ, नौदल, वायुदल, लष्कर यांची प्रत्येकवेळी आपल्याला मदत होत असते. यांच्याशी समन्वय ठेवून आपत्ती काळात मुंबईकरांना दिलासा द्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

मुंबई शहरात १२५ पर्जन्यमापक यंत्रे असून यावर्षी जून ते सप्टेंबर याकाळात हाय टाईडचे (साडेचार मीटर) २४ दिवस आहेत. ९३४ ठिकाणी पाणी उपसण्याचे पंप बसविण्यात आले असून ६५ मिनी पंपींग स्टेशन आहेत. पंपींग स्टेशनच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी यंदा स्मार्ट पंप व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

**जाहीर प्रगटन**
दैनिक महिला संवाद
मध्ये छोटचा जाहिराती आणि पॅनल जाहिराती
फक्त 300 रुपयात
प्रसिद्ध करण्यात येतील :
- जाहीर प्रगटन
- पाहिजेत / पाहिजे
- जन्मतारीख बदल
- नावात बदल
- मालमत्ता हस्तांतरण
- खरेदी-विक्री
- स्वरूपाच्या यासंबंधी छोटया जाहिराती
दैनिक महिला संवाद — आपला विश्वास, आमची जबाबदारी
जाहिराती केवळ 300 रुपरात प्रसिद्ध केल्या जातील.
इच्छुकांनी आजच या नंबरवर संपर्क साधावा.
9168567111

# रोहित पवारांच्या आंदोलनस्थळी भाजप कार्यकर्त्यांकडून गोमूत्र शिंपडले

**पंढरपूर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यात आमदार रोहित पवार पंढरपूर येथे आंदोलनाला बसले होते. रोहित पवार यांनी दोन दिवस अन्नत्याग आंदोलन केले. त्यांच्या या आंदोलनादरम्यान त्यांची मुलेही आंदोलनस्थळी पोहोचले. वडिलांना अशा परिस्थितीत पाहून लेकऱ्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते. रोहित पवार यांच्या अन्नत्याग आंदोलनाची दखल सरकारकडून घेण्यात आली. मंत्री गिरीष महाराज रोहित पवार यांच्या आंदोलनस्थळी पोहोचले होते. अनेकांनी रोहित पवार यांच्या आंदोलनाला नाटकबाजी म्हटले. जे लोक बीएमडब्लूमधून फिरतात, त्यांनी शेतकऱ्यांसाठी आंदोलन करणे म्हणजे हास्यास्पद असल्याचे काहींनी म्हटले.

आता रोहित पवार ज्याठिकाणी आंदोलनाला बसले होते, तिथे धक्कादायक प्रकार उघडकीस आला. रोहित पवार यांच्या अन्नत्याग स्थळी भाजपा कार्यकर्त्यांनी गोमूत्र शिपडले. आंदोलनामुळे पंढरपूर अशुद्ध झाल्याचा दावा माऊली हळणवर यांनी केला.

यासोबतच जे कोणी आंदोलनात सहभागी होते, त्यांच्यावर गुन्हे दाखल करा, अशीही मागणी यादरम्यान त्यांनी केले. या आंदोलनामुळे पंढरपूर अशुद्ध झाल्याचा दावा त्यांनी केला. भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव यांच्याकडून गोमूत्र शिपडण्यात आले. यावेळी काही घोषणा देखील देण्यात आल्या. आंदोलनामुळे वाहतूक कोंडी होऊन



भाविकांची गैरसोय झाल्याचा दावा करण्यात आला.

या प्रकरणावर बोलताना सक्षणा सलगर यांनी बोलताना म्हटले की, मला या गोष्टीचे आश्चर्य वाटते की, अशी जी लोक आहेत, भारतीय जनता पार्टीची देवेंद्र फडणवीस, गिरीष महाजन किंवा प्रदेशाध्यक्ष त्यांनी इकडे लक्ष दिले पाहिजे. हे असे गोमूत्र शिंपडून काय सिद्ध आपण करत आहोत हे बघितले पाहिजे. थोडे नीट पेपर फुटीवर बोलावे, देशामध्ये काय चालले यावर बोलायला हवं. पण या लोकांची त्यावर बोलायची पात्रता उरलेली नाहीये.

# भरधाव कारने चार जणांना चिरडले, डॉक्टर ताब्यात

**मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबई परिसर काल हिट अँड रनच्या घटनेने हादरून गेला आहे. एका भरधाव कारने फुटपाथवरील चार जणांना चिरडले आहेत. हे चारही पादचारी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहे.

जखमींमध्ये एका मुलीचाही समावेश आहे. या हिट अँड रन प्रकरणी एका डॉक्टराला ताब्यात घेण्यात आले आहे. हा अपघात अत्यंत थरारक होता. त्यामुळे अपघात पाहून प्रत्यक्षदर्शी हादरून गेले आहेत. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. ही घटना पाहून अंगावर शहारा आल्याशिवाय राहत नाही.

नवी मुंबईतील कळंबोली परिसरात भरधाव कारचा थरार पाहायला मिळाला. सेक्टर-१ मधील मार्केट परिसरात एका आलिशान कारने पादचाऱ्यांना धडक देत थेट डेंटल क्लिनिकला धडक दिली. या अपघातात



महिला, पुरुष आणि दोन लहान मुले जखमी झाली असून अनेक दुचाकींचेही नुकसान झाले आहे. कार चालक डॉ. संजय बरनवाल यांना कळंबोली पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, या घटनेचा थरारक सीसीटीव्ही व्हिडिओ समोर आला असून नागरिकांकडून कठोर कारवाईची मागणी होत आहे. काल संध्याकाळी ही हिट अँड रनची घटना घडली.

नवी मुंबईतील कळंबोली येथील भीषण अपघातात अडीच वर्षांच्या चिमुकलीसह तिचे वडील आणि आणखी एक व्यक्ती जखमी झाले आहेत. जखमींमध्ये गणेश घागरे (वय ३४), त्यांची मुलगी ऋषींका घागरे आणि शिवचरण राजपूत (वय ३०) यांचा समावेश आहे. गणेश घागरे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून चिमुकली ऋषींकाच्या चेहऱ्यावर व शरीरावर जखमा आहेत. सर्व जखमींवर सध्या एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघातानंतर नियंत्रण सुटलेली कार फुटपाथ ओलांडून रस्त्याच्या कडेला असलेल्या एका दुकानात घुसली. त्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. प्राथमिक माहितीनुसार, कळंबोली येथील सत्यम हॉस्पिटलचे संचालक डॉ. संजय बारणवाल हे स्वतः वाहन चालवत होते.


घटनेची माहिती मिळताच कळंबोली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. हा अपघात नेमका कोणत्या परिस्थितीत घडला आणि त्यामागील नेमके कारण काय, याचा शोध पोलीस घेत आहेत.

# पुण्यात धक्कादायक घटना! तरुणीला कालव्यात ढकलून दिले, १८ तासांनंतर मृतदेह सापडला

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली असून महिलांवरील अत्याचारांच्या घटनाही सातत्याने समोर आल्या आहेत. त्यातच, आता मंचरजवळील निघोटवाडी फाटा येथे एका तरुणीला डिंभे धरणाच्या उजव्या कालव्यात फेकून दिल्याची व त्यानंतर आरोपी तरुणाने स्वतः पाण्यात उडी मारल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पाण्यात उडी मारल्यानंतर आरोपी तरुणाला स्थानिकांनी वाचविले असले तरी तरुणी मात्र पाण्यात वाहून गेली होती. सुमारे १८ तासांच्या शोध मोहिमेनंतर या तरुणीचा मृतदेह सापडला आहे. याप्रकरणी आरोपीला मंचर पोलिसांनी अटक केली आहे.

माळशिरसजवळील तांदुळवाडी येथे विहिरीत पिकअप पडून झालेल्या दुर्घटनेनं महाराष्ट्र हळहळला आहे. एकीकडे अपघाताच्या घटना कमी होताना दिसून येत नाहीत, तर दुसरीकडे गुन्हेगारीच्या घटनाही सातत्याने घडत आहेत. पुणे जिल्ह्यातील मंचर येथे एका युवतीला



धरणाच्या कालव्यात ढकलून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रविवारी सायंकाळी रमेश बबन कडाळे या तरुणाने स्वप्नाली भांगरे या तरुणीसोबत झटापट करून तिला डिंभे धरणाच्या उजव्या कालव्याच्या पाण्यात ढकलल्याचा आरोप आहे. स्वप्नाली भांगरेला पाण्यात ढकलल्यानंतर आरोपी रमेश कडाळेने स्वतः पाण्यात उडी मारली होती. ही बाब स्थानिकांच्या लक्षात आल्यानंतर आरोपी रमेश कडाळेला स्थानिकांनी वाचविले होते. मात्र, स्वप्नाली ही तरुणी पाण्यात वाहून गेली होती.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळाल्यानंतर मंचर पोलीस, आपत्ती व्यवस्थापन पथक आणि स्थानिक नागरिकांनी शोधमोहीम राबविली. तब्बल १८ तासांनंतर सोमवारी स्वप्नाली भांगरे चा मृतदेह सापडला. या प्रकरणी मंचर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी रमेश बबन कडाळेला पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

# हुंड्याच्या छळातून गर्भवती महिलेवर अमानुष अत्याचार

**मुंबई । प्रतिनिधी**

कल्याणमधील वालधुनी परिसरातून माणुसकीला काळिमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. हुंड्यासाठी सासरच्या मंडळींनी छळाची परिसीमा गाठत एका गर्भवती विवाहितेचे चक्क टक्कल केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या अमानुष छळातून कशीबशी सुटका करून घेत पीडित महिला सासरहून पळून माहेरी आली असून, सध्या तिच्यावर उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे संपूर्ण कल्याण आणि उल्हासनगर परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अफसाना अन्सारी असे या पीडित विवाहितेचे नाव असून ती मूळची उल्हासनगरची रहिवासी आहे. नोव्हेंबर २०२५ मध्ये तिचा विवाह कल्याणच्या वालधुनी परिसरात राहणाऱ्या समीर अन्सारी याच्यासोबत झाला होता. लग्न करताना मुलीच्या माहेरच्यांनी आपली हुंडा देण्याची परिस्थिती नसल्याचे सासरच्यांना आधीच स्पष्ट केले होते. मात्र, तरीही लग्न पार पडल्यानंतर अवघ्या महिन्याभरातच सासरच्या मंडळींनी हुंड्यासाठी अफसानाचा छळ करण्यास सुरुवात केली.

पीडित महिला गर्भवती असतानाही तिला सासरच्यांकडून जेवण दिले जात नव्हते. घरातील शिल्लक जेवण मुद्दाम फ्रिजमध्ये कुलूप लावून ठेवले जायचे. अमानुष मारहाण करणे, कोणतीच वस्तू किंवा वैद्यकीय उपचारांसाठी पैसे न देणे, इतकेच नव्हे तर गरम पाण्याने तिचे हात जाळण्याचे क्रूर कृत्यही सासरच्यांनी केले. माहेरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीब असल्यामुळे पीडित महिलेने हा सगळा त्रास गुपचूप सहन केला.



सासरच्यांचा छळ एवढ्यावरच थांबला नाही, तर ७ जून रोजी क्रौर्याचा कळस गाठला गेला. 'तुझ्या डोक्यात उवा झाल्या आहेत', असे खोटे कारण पुढे करत सासरच्यांनी जबरदस्तीने अफसानाचे टक्कल केले. हा अपमान आणि अमानुष छळ असह्य झाल्यामुळे महिलेने सासरच्यांच्या तावडीतून कशीबशी स्वतःची सुटका करून घेतली आणि ती घरातून पळून थेट आपल्या बहिणीकडे गेली. तेथून तिने आपला भाऊ नीर हसन अन्सारी याला फोन करून संपूर्ण आपबिती सांगितली. भावाने तातडीने बहिणीची ढासळलेली प्रकृती पाहून तिला उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

क्रौर्याची सर्व परिसीमा ओलांडणाऱ्या या गंभीर प्रकरणाची आता थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दखल घ्यावी आणि पीडित महिलेला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी सामाजिक स्तरातून होत आहे. सासरच्या नराधमांवर अतिशय कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी कुटुंबाने केली आहे. याप्रकरणी सध्या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## संपादकीय...

# विषारी फॉस्फाइडचा फटका

मुंबईतील गिरगाव परिसरात घडलेली दोन वर्षांच्या चिमुरडीच्या विषबाधेची घटना प्रत्येक पालक, नागरिक आणि प्रशासनासाठी गंभीर इशारा देणारी आहे. अन्नधान्याचे संरक्षण करण्यासाठी वापरण्यात आलेल्या ल्युमिनियम फॉस्फाइड या विषारी रसायनाच्या वाफांमुळे एका निष्पाप बालिकेचा जीव धोक्यात आला आहे. उपचारादरम्यान तिला तीन वेळा हृदयविकाराचा झटका आला, किडनीवर परिणाम झाला आणि ती मृत्यूशी झुंज देत आहे. ही घटना केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसून समाजातील वाढत्या निष्काळजीपणाचे आणि विषारी रसायनांबाबतच्या अज्ञानाचे भयावह चित्र समोर आणणारी आहे. आज ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत धान्य, कडधान्ये आणि इतर अन्नपदार्थ साठवताना विविध प्रकारची कीटकनाशके वापरली जातात. अनेकदा ही रसायने कोणत्याही तांत्रिक सल्ल्याशिवाय किंवा सुरक्षिततेच्या नियमांची माहिती नसताना वापरली जातात. अन्नधान्याचे संरक्षण करण्याचा उद्देश योग्य असला तरी त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या घातक रसायनांमुळे मानवी जीव धोक्यात येत असेल, तर हा विषय अत्यंत गांभीर्याने घेण्याची गरज आहे. ल्युमिनियम फॉस्फाइड हे कृषी क्षेत्रात वापरले जाणारे अत्यंत विषारी रसायन आहे. त्याचा वापर प्रामुख्याने गोदामे, धान्य साठवण केंद्रे आणि मोठ्या प्रमाणातील अन्नसाठ्यांमध्ये केला जातो. या रसायनाच्या संपर्कात आल्यास किंवा त्यातून निर्माण होणारा वायू श्वासाद्वारे शरीरात गेल्यास काही तासांतच गंभीर परिणाम दिसू शकतात. श्वसनाचा त्रास, उलट्या, जुलाब, हृदयाचे विकार, यकृत आणि मूत्रपिंड निकामी होणे अशा गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. अशा रसायनांचा वापर घरगुती वातावरणात होणे हीच चिंतेची बाब आहे. या घटनेतून आणखी एक महत्त्वाची बाब समोर येते ती म्हणजे जनजागृतीचा अभाव. घरात तीव्र वास येत असूनही त्याकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही. अनेकदा नागरिकांना अशा रसायनांच्या धोक्यांची माहिती नसते. दुकानातून औषध खरेदी करताना त्याचा वापर कसा करायचा, किती प्रमाणात करायचा, कोणती काळजी घ्यायची याची सविस्तर माहिती दिली जात नाही. परिणामी, अज्ञानातून अनेक दुर्घटना घडतात. भारतात दरवर्षी हजारो लोक विविध प्रकारच्या कीटकनाशकांच्या विषबाधेमुळे बाधित होतात. ग्रामीण भागात आत्महत्यांसाठी कीटकनाशकांचा वापर होतो, तर काही ठिकाणी चुकीच्या वापरामुळे अपघाती मृत्यू होतात. मात्र घरगुती वापरातील अशा घटना प्रशासनाच्या लक्षात येत नाहीत. विषारी पदार्थांच्या विक्रीवर पुरेसे नियंत्रण नसणे हीदेखील गंभीर समस्या आहे. अनेक दुकानदार कोणतीही तपासणी किंवा मार्गदर्शन न करता अशी रसायने विकतात. यामुळे सर्वसामान्य नागरिक नकळत मोठ्या धोक्याला आमंत्रण देतात. यावर उपाय म्हणून शासनाने विषारी रसायनांच्या विक्रीसाठी अधिक कठोर नियम लागू करणे आवश्यक आहे. अशा पदार्थांची विक्री केवळ परवानाधारक विक्रेत्यांमार्फतच व्हावी. ग्राहकांना लेखी सूचना देणे बंधनकारक करण्यात यावे. पॅकेजिंगवर स्थानिक भाषेत स्पष्ट इशारे, धोक्याचे चिन्ह आणि आपत्कालीन संपर्क क्रमांक छापणे आवश्यक आहे. तसेच विषारी रसायनांच्या वापराबाबत वेळोवेळी जनजागृती मोहिमा राबविण्यात याव्यात. शाळा, महाविद्यालये, अंगणवाड्या, ग्रामपंचायती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनीदेखील यामध्ये पुढाकार घेण्याची गरज आहे. आरोग्य विभाग, कृषी विभाग आणि अन्न सुरक्षा यंत्रणा यांनी संयुक्तपणे नागरिकांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. विशेषतः घरात लहान मुले असल्यास कोणतेही रासायनिक पदार्थ, औषधे किंवा कीटकनाशके त्यांच्या आवाक्याबाहेर ठेवणे ही प्रत्येक कुटुंबाची प्राथमिक जबाबदारी आहे. या घटनेने आधुनिक जीवनशैलीतील एक कटू वास्तव समोर आणले आहे.

# चला, पाल्यांना मराठी शाळेत घालूया !

जून महिना उजाडला की नव्या शैक्षणिक वर्षाची चाहूल लागते. घराघरांत मुलांच्या शाळा प्रवेशाची लगबग सुरू होते. आपल्या पाल्याला कोणत्या शाळेत प्रवेश द्यावा, हा प्रत्येक पालकासमोरील महत्त्वाचा प्रश्न असतो. अशा वेळी एक मराठी माणूस, एक जबाबदार पालक आणि आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगणारा नागरिक म्हणून आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे - आपल्या मुलाला जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत प्रवेश का देऊ नये?

आज आपल्या राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक, माध्यमिक शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्तम शिक्षक, आधुनिक सुविधा आणि संस्कारक्षम वातावरण यामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहेत. याला आणखी उंचीवर पोहोचविण्यासाठी आवश्यक आहे तो पालकांचा विश्वास ! आणि पालक म्हणून आपला सक्रिय सहभाग ! केवळ अफवा आणि यंत्रणेसंदर्भातील नकारात्मक दृष्टिकोन यामुळे ग्रामीण भागातील कमी खर्चाची, योग्य गुणवत्तेची आणि संस्कार करणारी एक यंत्रणा आम्ही कमकुवत तर करत नाही ना ? हा प्रश्न एकदा स्वतःला विचारणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत इतिहास घडवला तो जिल्हा परिषदेच्या शाळांनी.या शाळांमधून आजचे उच्चपदस्थ अधिकारी, शास्त्रज्ञ,डॉक्टर, वकील,कवी, लेखक,कृषी तज्ञ,समाज सुधारक तयार झाले आहेत. विशेषतः मराठी माध्यमातू शिकूनही ते कुठेही गुणवत्तेत मागे पडलेले नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण आमच्या अनेक पिढ्यांनी अनुभवले आहे.अपार कष्ट ,अवहेलना सहन करून अशा शाळांमधून शिक्षण घेत त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. देशातील मोठमोठ्या संस्थांवरचे गुणवान जिल्हा परिषदेच्या शाळांमधूनच तयार झाले आहे. त्यामुळे आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या आणि विशेषतः जिल्हा परिषद शाळांच्या दारी नेण्याची हीच योग्य वेळ आहे.

**जिल्हा परिषद शाळा : गुणवत्तेची खात्री**

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची निवड अत्यंत पारदर्शक आणि गुणवत्तेच्या निकषांवर आधारित असते. शिक्षक पात्रता परीक्षा (ढएढ), विविध स्पर्धात्मक प्रक्रिया, शैक्षणिक गुणवत्ता आणि शासनाने ठरवून दिलेल्या नियमांच्या आधारे शिक्षकांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे समाजातील गुणवंत, प्रशिक्षित युवकच शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसमोर उभे राहतात. जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या गुणवत्तेची वेळोवेळी तपासणी होते. प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे या शाळांमध्ये अप्रशिक्षित शिक्षक हा प्रश्न निकाली निघाला आहे. शिक्षक हे राष्ट्रनिर्माते असतात. आपल्या गुरु शिष्य प्राचीन परंपरेला याच शाळा पुढे घेऊन गेल्या आहेत. येथील शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, संस्कारांसाठी, देशाच्या आधुनिक शैक्षणिक धोरणांशी जोडले गेले असतात. त्यामुळे शासकीय शैक्षणिक संस्था अर्थात आपल्या शाळा जबाबदार नागरिक घडविणारी यंत्रणा म्हणून पुढे आल्या आहेत.

मातृभाषेतून शिक्षण : अधिक आत्मविश्वास देणारे शैक्षणिक संशोधन सातत्याने सांगते की, मुलांचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेत झाले तर त्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती आणि सर्जनशीलता अधिक चांगल्या प्रकारे विकसित होते. मराठी माध्यमातून शिकणारी मुले केवळ भाषा शिकत नाहीत, तर आपल्या संस्कृतीशी, इतिहासाशी, परंपरांशी, वारशाशी आणि सामाजिक मूल्यांशी जोडली जातात. मराठी भाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. ते आपले विचार स्पष्टपणे व्यक्त करू शकतात. इंग्रजी व अन्य भाषा शिकणे आवश्यक आहेच; परंतु शिक्षणाचा पाया मातृभाषेत असणे अधिक परिणामकारक असल्याचे अनेक जागतिक तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

**सर्वात मोठे बलस्थान : समर्पित शिक्षक**

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना शासनाकडून नियमित व पूर्ण वेतन दिले जाते. त्यामुळे त्यांचे संपूर्ण लक्ष अध्यापन, विद्यार्थ्यांचा विकास आणि शाळेच्या प्रगतीकडे केंद्रित राहते. काही समर्पित शिक्षक स्वतःच्या खर्चातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देतात, विविध उपक्रम राबवितात आणि गावोगावी शिक्षणाची ज्योत तेवत ठेवतात. साने गुरुजींच्या महाराष्ट्रात आजही अनेक ठिकाणी शिक्षकांच्या नावाने ती शाळा ओळखल्या जातात. आज अनेक जिल्हा परिषद शाळांनी डिजिटल वर्गखोल्या, संगणक शिक्षण, विज्ञान प्रयोगशाळा, ई-लर्निंग सुविधा, क्रीडा साहित्य आणि विविध नवोपक्रमांच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे.सेमी इंग्लिश शिक्षण पद्धती शाळांनी अवलंब केली आहे.शालेय व्यवस्थापन समिती आणि माझी विद्यार्थी मंडळाकडून अनेक सुधारणा होत आहे.

**राज्याचे शैक्षणिक धोरण ;मातृभाषेचे महत्त्व**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तसेच महाराष्ट्र शासनाचे शैक्षणिक धोरण प्राथमिक स्तरावर मातृभाषेत शिक्षण देण्याला विशेष महत्त्व देते. मुलांचा बौद्धिक विकास, भाषिक कौशल्ये आणि संकल्पना समजून घेण्याची क्षमता वाढविण्यासाठी मातृभाषा हे सर्वात प्रभावी माध्यम असल्याचे या धोरणांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.याच विचारातून महाराष्ट्रातील मराठी शाळांना अधिक सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण बनविण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. विशेष म्हणजे कला, क्रीडा, स्पर्धा परीक्षा या संदर्भातील मुलांच्या विकासाची यंत्रणा, श्रृंखला याच शाळांमध्ये पूर्ण होते. इथे निधी अभावी कधीही विद्यार्थ्यांच्या खिशातून पैसा काढून स्पर्धा घेतली जात नाही, रद्द होत नाही,पुढे ढकलली जात नाही. क्रीडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विज्ञान प्रदर्शनी, शिक्षकांचे प्रशिक्षण एकदा ठरले की पूर्ण केले जाते. राज्याच्या बाल कल्याण धोरणाला, बौद्धिक धोरणाला याच व्यासपीठावर राबविले जाते. त्यामुळे या यंत्रणेतून आपण बाद तर होत नाही ना ? याचा विचार व्हावा.

आता प्रवेशासाठी लागतात रांगा




एक काळ असा होता की काही पालकांना जिल्हा परिषद शाळा म्हणजे ग्रामीण भागातील भक्कम पर्याय वाटत असे. मात्र, अफवा, गैरसमज,आणि काही अपवादात्मक घटनांनी या शाळा मधल्या काळात ओस पडायला लागल्या होत्या. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांनी आपल्या गुणवत्तेमुळे वेगळी ओळख निर्माण केली आहे.सातारा, कोल्हापूर, पुणे, सिंधुदुर्ग, नाशिक, नागपूर, जळगाव आणि इतर अनेक जिल्ह्यांतील काही जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशासाठी पालकांची मोठी मागणी दिसून येते. अनेक शिक्षकांनी आपल्या दायित्वातून,गुणवत्तेतून ,कल्पकतेतून शाळांना नवी ओळख दिली आहे. डिजिटल शिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संस्कारक्षम वातावरण आणि विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट निकाल यामुळे या शाळांवर पालकांचा विश्वास वाढत आहे.

**नवे शैक्षणिक धोरण ;शाळांनी कात टाकली**

काही ठिकाणी अपवादात्मक शाळांच्या जीर्ण इमारती व आवश्यक सोयीसुविधांची कमतरता दिसते. त्यामुळे पालकांनी केवळ भौतिक सुविधा बघून शाळांबाबत भूमिका बनविणे अयोग्य आहे.गरिबातील गरीब विद्यार्थ्यापासून सर्वांना शिक्षण मिळावे, अशी समतोल भूमिका शासनाची आहे.त्यामुळे अतिशय माफक शुल्कामध्ये या शाळेतील शिक्षण मुलांना घेता येते.आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक प शाळांनी विकसित केले आहे.शिक्षकांना जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडावे लागत आहे.निपुण शाळा या मोहिमेतून शाळातील शिक्षणावर नियंत्रण ठेवले जात आहे. तिसऱ्या वर्गापासून प्रज्ञाशोध परीक्षा, चौथी व सातवीत होणारी स्कॉलरशिप परीक्षा, टॅलेंट सर्च परीक्षा,शालेय गणवेष, शालेय पोषण आहार, सगळ्यांना मोफत पुस्तके, केळी व अंडी वाटप, मुलींसाठी दैनिक भत्ता, मुलींना स्वतंत्र स्वच्छता गृह, सॅनेटरी नॅपकीनची उपलब्धता ,प्रवेश उत्सव, संस्कार शिबीर,अशा विविध उपक्रमांना शाळेत राबविण्यात येते. पहिलीपासून इंग्रजी अनिवार्य केले आहे. त्यामुळे इंग्रजी पासून कोणी वंचित राहत नाही. प्रत्येक जिल्ह्यातील काही शाळा सेमी इंग्लिश झाल्या आहेत. याशिवाय या सर्व यंत्रणेवर पालकांच्या पाच समित्यांचे नियंत्रण असते.त्यामुळे बाह्य चकाकी व इंग्रजी माध्यमांच्या आग्रहातून मुले दर्जेदार प्रशिक्षित शिक्षकांपासून, शिक्षणापासून वंचित राहू नये यावर विचार करण्याची ही गरज आहे.

**अनेक गावांनी शाळांसाठी घेतला पुढाकार**

मराठी शाळा वाचविणे म्हणजे आपली ओळख जपणे होय.घरापासून योग्य अंतरावर असणारी शाळा मुलांना त्यांच्या बाल्यावस्थेत खेळ व अन्य कला गुणांसाठी भरपूर वेळ वाचवू शकते. गावातील शाळा बाजूला ठेवून शहरातील, तालुक्याच्या ठिकाणच्या शाळांसाठी पालकांना मोठ्या प्रमाणात अतिरिक्त खर्चही करावा लागतो. वाहन व्यवस्था करावी लागते. यामध्ये मुलांच्या जडणघडणीचा वेळ जातो. अनेक गावांनी ग्रामपंचायतीमार्फत ज्या पालकांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेतला त्यांना घरपट्टीतही सवलत दिली आहे.अनेक गावांनी शिक्षकांना मुख्यालयी राहणे अनिवार्य केले आहे. गावाचे, गावातील प्रमुखांचे ,शाळांकडे लक्ष असणे आणि शिक्षकांचे गावातच राहणे यामुळे आदर्श जीवनपद्धतीची जपणूक ही होते. गावाप्रतीचा आदरही वृद्धिंगत होतो. शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी संस्था नसते; ती संस्कृती, परंपरा, मूल्ये आणि समाजाची ओळख जपणारे केंद्र असते. गरीबी, श्रीमंती सोबत मिळणारे एकत्रित शिक्षण सामाजिक जाणिवा वृद्धींगत करते. त्यामुळे मराठी शाळा टिकल्या तर मराठी भाषा टिकेल. मराठी भाषा टिकली तर महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक बळकट राहील. त्यामुळे आज आपल्या मुलाला मराठी शाळेत प्रवेश देणे म्हणजे केवळ एका शाळेची निवड नव्हे; तर आपल्या भाषेवर, संस्कृतीवर आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेवर व्यक्त केलेला विश्वास आहे. पालक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, तलाठी, नगरसेवक, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षण तज्ञ या सर्वानीच ही बाब अधोरेखित करावी. अनियंत्रित खासगी यंत्रणेचे फटके समाज व्यवस्थेला बसत असताना, शिक्षणाची ही मूळ साखळी पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन शाळांना, शाळेच्या यंत्रणेला बळकट करणे आवश्यक आहे.

**चला, एक सकारात्मक निर्णय घेऊ या!**

यंदाच्या शैक्षणिक वर्षात आपल्या गावातील, परिसरातील जिल्हा परिषद शाळेला भेट द्या. तेथील शिक्षकांशी संवाद साधा. शाळेच्या सुविधा पाहा. विद्यार्थ्यांचे यश जाणून घ्या. आणि मग आपल्या पाल्याच्या भविष्यासाठी विचारपूर्वक निर्णय घ्या. आमचे आई-वडील, आम्ही आणि आमची मुले जिल्हा परिषदेच्या शाळेतच शिकलेलो आहे. त्यामुळे यावर्षी निर्धारपूर्वक ठरवूया, आपल्या पुढच्या पिढीतील पाल्यांना मराठी शाळेत घालू या

मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांचा अभिमानाने वारसा पुढील पिढीकडे सुपूर्द करू या!

**प्रवीण टाके**
उपसंचालक, (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर

# राज्यभर एकात्मिक आरोग्यवर्धिनी समित्यांच्या बैठका सुरु

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील आरोग्य सेवा अधिक लोकाभिमुख, प्रभावी आणि समन्वयपूर्ण करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभागाने स्थापन केलेल्या एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीच्या बैठका राज्यभर सुरू झाल्या आहेत. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामुळे लोकप्रतिनिधी, प्रशासन, आरोग्य यंत्रणा आणि नागरिक यांच्यातील समन्वय अधिक बळकट होत असून स्थानिक स्तरावरील आरोग्यविषयक प्रश्नांच्या प्रभावी निराकरणाला चालना मिळत आहे.

१३ जून २०२६ पर्यंत राज्यातील २५ जिल्ह्यांमधील विधानसभा स्तरावरील समित्यांपैकी ४ समित्यांच्या बैठका पार पडल्या असून २१ समित्यांच्या बैठका नियोजित आहेत. धुळे जिल्ह्यातील साक्री आणि शिरपूर, अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर येथे बैठका यशस्वीपणे पार पडल्या आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड येथे समितीची बैठक १३ जून रोजी आयोजित करण्यात आली.

याशिवाय पेण, विक्रमगड, नांदगाव, मालेगाव (आऊटर), बागलाण, कळवण, दिंडोरी, राधानगरी, कागल, शाहुवाडी, इचलकरंजी, दापोली, बसमत, अकोट, बाळापूर आणि आरमोरी या मतदारसंघांमध्ये बैठकींच्या तारखा निश्चित करण्यात आल्या आहेत. काही जिल्ह्यांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू असल्याने तेथील बैठका पुढे आयोजित करण्यात येणार आहेत.

नियमित आढावा आणि प्रभावी समन्वय

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पालकमंत्री तसेच विधानसभा सदस्यांना समिती स्थापनेसंदर्भातील प्रस्ताव पाठविण्याचे काम सुरू असून बैठकींच्या आयोजनासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. राज्यस्तरावर गुगल शीट, दूरध्वनी संपर्क आणि जिल्हास्तरीय समन्वय यंत्रणेच्या माध्यमातून समित्यांच्या कामकाजाचा नियमित आढावा घेण्यात येत आहे.

राज्यातील आरोग्य व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्यासाठी समित्यांची बहुस्तरीय रचना करण्यात आली आहे.यामध्ये ग्रामीण विधानसभा मतदारसंघ, महानगरपालिका क्षेत्रातील विधानसभा मतदारसंघ, जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती आहेत. या समित्यांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी, प्रशासन, आरोग्य अधिकारी आणि नागरिक यांच्यात सातत्यपूर्ण संवाद घडून येणार असून आरोग्य सेवांमध्ये उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि परिणामकारकता वाढण्यास मदत होणार आहे.

आरोग्य सेवा केवळ उपचारापुरती मर्यादित न ठेवता लोकसहभाग, स्थानिक नेतृत्व आणि समन्वयाच्या माध्यमातून अधिक प्रभावी बनविण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. एकात्मिक आरोग्यवर्धिनी समित्या या प्रयत्नांना संस्थात्मक स्वरूप देत असून निरोगी महाराष्ट्र, सक्षम महाराष्ट्र या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. आरोग्य सेवांबाबतच्या स्थानिक गरजा,

अडचणी आणि अपेक्षा यांचा थेट आढावा घेऊन त्वरित उपाययोजना करण्यासाठी हे व्यासपीठ उपयुक्त ठरत असून राज्यातील आरोग्य व्यवस्थेला अधिक लोकाभिमुख आणि उत्तरदायी बनविण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# नांदेडच्या गाजलेल्या सोनेतारण घोटाळ्याला नवे वळण; मुख्य आरोपीचा उपचारादरम्यान अंत

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या (डइख) डॉक्टर लेन शाखेत उघडकीस आलेल्या सुमारे लाखो रुपयांच्या बनावट सोनेतारण घोटाळ्यातील मुख्य आरोपी तथा बँकेचा रोकड व्यवस्थापक आदित्य प्रकाश सेनगावकर याचा राजस्थानातील भरतपूर येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण प्रकरणाला नवे वळण मिळाले असून घोटाळ्याच्या तपासाबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

दरम्यान, गुन्हा दाखल होताच जीवन जगदाळे पोलिसांच्या ताब्यात आला. मात्र आदित्य सेनगावकर हा गुन्हा नोंदवण्यापूर्वीच नांदेडमधून बेपत्ता झाला होता. त्याच्या पत्नीनेही त्याच्या बेपत्ता असल्याची तक्रार पोलिसांकडे दिली होती. त्यानंतर स्थानिक पोलिसांनी त्याचा शोध घेण्यासाठी विविध राज्यांमध्ये तपास सुरू ठेवला होता. आदित्य सेनगावकर राजस्थानातील भरतपूर येथे असल्याची माहिती समोर आली. तेथे त्याला अस्वस्थ वाटू लागल्याने एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरु असतानाच त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले आहे. प्राथमिक माहितीनुसार त्याने आत्महत्या केलेली नसल्याचे अधिकृत सूत्राच्या माहितीवरून सांगण्यात आले घोटाळ्याचा तपास अद्याप सुरू असून मुख्य आरोपीच्या मृत्यूमुळे प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे. पोलिसांकडून आता उपलब्ध पुराव्यांच्या आधारे उर्वरित आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिलीन आहे.



नांदेड येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या (डइख) डॉक्टर लेन शाखेत उघडकीस आलेल्या सुमारे लाखो रुपयांच्या बनावट सोनेतारण घोटाळ्यातील मुख्य आरोपी तथा बँकेचा रोकड व्यवस्थापक आदित्य प्रकाश सेनगावकर याचा राजस्थानातील भरतपूर येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण प्रकरणाला नवे वळण मिळाले असून घोटाळ्याच्या तपासाबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

दरम्यान, गुन्हा दाखल होताच जीवन जगदाळे पोलिसांच्या ताब्यात आला. मात्र आदित्य सेनगावकर हा गुन्हा नोंदवण्यापूर्वीच नांदेडमधून बेपत्ता झाला होता. त्याच्या पत्नीनेही त्याच्या बेपत्ता असल्याची तक्रार पोलिसांकडे दिली होती. त्यानंतर स्थानिक पोलिसांनी त्याचा शोध घेण्यासाठी विविध राज्यांमध्ये तपास सुरू ठेवला होता.आदित्य सेनगावकर राजस्थानातील भरतपूर येथे असल्याची माहिती समोर आली. तेथे त्याला अस्वस्थ वाटू लागल्याने एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले आहे.

प्राथमिक माहितीनुसार त्याने आत्महत्या केलेली नसल्याचे अधिकृत सूत्राच्या माहितीवरून सांगण्यात आले घोटाळ्याचा तपास अद्याप सुरू असून मुख्य आरोपीच्या मृत्यूमुळे प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे.



## थोडक्यात

### राज्याच्या विकासात ‘स्टँडर्ड चार्टर्ड’ बँकेचे योगदान महत्त्वपूर्ण - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रात जलसुरक्षा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि हवामान बदलाला तोंड देण्याच्या क्षमतेच्या विकासासाठी राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा राज्यातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना थेट लाभ झाला आहे. या उपक्रमांमुळे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, राज्य शासन आणि खासगी क्षेत्र यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विकासाचे फायदे समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहेत. जलसंवर्धन, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांत स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने केलेले कार्य राज्याच्या विकास उद्दिष्टांना पूरक ठरत आहे. बँकेच्या विविध सामाजिक उपक्रमांच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असून, जलसंधारण, आरोग्यसेवा आणि उपजीविका वृद्धी या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये; तसेच राज्यातील ७५ टक्के आकांक्षी जिल्ह्यांमध्ये हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले आहेत.

जलसुरक्षा उपक्रमांतर्गत १.०६ अब्ज लीटर गोड्या पाण्याची साठवण क्षमता निर्माण करण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागांमध्ये ४५ वॉटर एटीएमची स्थापना करण्यात आली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील गावांसह राज्यातील २७१ गावांमध्ये जलसुरक्षा मजबूत करण्यात आली आहे; तसेच आठ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना जलसंवर्धन उपाययोजना आणि हवामान-सुसंगत शेती तंत्रज्ञानासाठी मदत करण्यात आली आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करण्याच्या दिशेने सात लाख वृक्षांची लागवड हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. रोजगारक्षमतेच्या क्षेत्रात ६५९८ युवकांना कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ६३ टक्के युवकांना रोजगार मिळाला आहे. इलेक्ट्रिक वाहने, वाहन उद्योग, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, बँकिंग आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १.६६ लाख रुपये इतके नोंदविण्यात आले आहे. या कार्यक्रमातील ६१ टक्के लाभार्थी महिला असून, ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना विशेष आर्थिक सहाय्य पुरविण्यात आले आहे. याशिवाय ७५८ महिला सूक्ष्म उद्योजिकांनाही मदत करण्यात आली आहे. आरोग्य क्षेत्रात बँकेच्या ‘सीईंग इज बिलिव्हिंग’ या प्रमुख उपक्रमांतर्गत चार लाख ३९ हजार ६८८ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर ३८ हजार ६२५ नेत्रशस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या. राज्यभरात ४९ दृष्टी केंद्रांची स्थापना करण्यात आली असून, ही केंद्रे आता स्वयंपूर्ण पद्धतीने कार्यरत आहेत. या केंद्रांमधून दरवर्षी सुमारे १.६ कोटी रुपयांचे उत्पन्न निर्माण होत आहे. जिल्हा अंधत्व नियंत्रण संस्था आणि आयुष्मान भारत यांसारख्या शासकीय योजनांशी समन्वय साधून या उपक्रमांचा विस्तार करण्यात आला आहे. स्टँडर्ड चार्टर्ड बँक, भारतच्या शाश्वतता विभागाच्या प्रमुख करुणा भाटिया यांनी सांगितले की, वंचित आणि दुर्लक्षित समुदायांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी बँक कटिबद्ध असून, महाराष्ट्रातील जलसुरक्षा, आरोग्य आणि रोजगार क्षेत्रातील उपक्रम ही दीर्घकालीन सामाजिक बांधिलकीची प्रभावी उदाहरणे आहेत. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी नमूद केले की, राज्यातील लाखो नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे हे उपक्रम शाश्वत विकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक समावेशनाला गती देणारे ठरत आहेत.

# महापालिका शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे आदर्श केंद्र बनाव्यात, हीच आमची भूमिका - महापौर रवि लांडगे

**पिंपरी । प्रतिनिधी**

महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण, आधुनिक सुविधा आणि सर्वांगीण विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत, जिज्ञासू वृत्ती जोपासावी आणि अभ्यासासोबतच खेळ, कला व संस्कार यांनाही तितकेच महत्त्व द्यावे. पालक, शिक्षक आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतून विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडणार असून महापालिका शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आदर्श केंद्र तयार होतील अशीआमची भूमिका असल्याचे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

भारत माता की जय'' असा जयघोष करत ढोल ताशांच्या गजरात, लेझीमच्या तालावर उत्साही आणि आनंदी वातावरणात विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने शाळेची घंटा आज वाजली. नवी उमेद आणि आशा घेऊन महापालिका शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत त्यांच्या पालकांसह मोठ्या हर्षोल्हासात भोसरी येथील इंद्रायणीनगर पी. सी. एम. सी. पब्लिक स्कूल येथे महापौर रवि लांडगे यांनी तर पिंपळेगुरव येथील पी. सी. एम. सी. पब्लिक स्कूल क्र. ५४ येथे आमदार शंकर जगताप आणि महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सपत्निक उपस्थित राहून केले.



विविध ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात शिक्षण समिती सभापती रविना अंगोळकर, नगरसदस्य शशिकांत कदम, ज्ञानेश्वर जगताप, शंकुतला धराडे, शाम जगताप, नम्रता लोंढे, माजी नगरसदस्य सागर अंगोळकर, पल्लवी जगताप, विलास मडिगेरी, उप आयुक्त ममता शिंदे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, मुख्याध्यापिका गीतांजली पोळ, पर्यवेक्षक ज्योती तापकीर यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापौर रवि लांडगे म्हणाले, नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह पाहून समाधान वाटते. हीच मुले उद्याच्या विकसित भारताची शिल्पकार आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला सुरक्षित, आनंददायी आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण मिळावे यासाठी महापालिका कटिबद्ध आहे. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने शिक्षण घ्यावे, नवीन गोष्टी शिकाव्यात आणि आपल्या कर्तृत्वाने कुटुंब, शहर व देशाचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा देखील महापौर रवि लांडगे यांनी यावेळी दिल्या.

आमदार शंकर जगताप म्हणाले, नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील आनंदाचा आणि उत्साहाचा क्षण असतो. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, नवीन काहीतरी शिकण्याची जिज्ञासा आणि भविष्यात मोठे होण्याची स्वप्ने हीच आपल्या देशाच्या उज्ज्वल भविष्यातील पायाभरणी आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यामध्ये शिक्षण संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून ज्ञानमंदिरात शिक्षण घेणारा प्रत्येक विद्यार्थी हा त्या प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक आहे.

शिक्षक हे केवळ विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य करतात. भावी पिढी सुसंस्कृत, सक्षम आणि जबाबदार नागरिक म्हणून घडविण्याची मोठी जबाबदारी शिक्षक पार पाडत आहेत. त्यामुळे शिक्षकांचे योगदान समाजासाठी अत्यंत मोलाचे आहे. महापालिकेच्या शाळांबाबत पालकांचा आणि समाजाचा दृष्टीकोन आता सकारात्मकपणे बदलत असल्याचे दिसून येत आहे. शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता, आधुनिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम यामुळे महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. ही बाब निश्चितच समाधानकारक आहे. मात्र, शिक्षणाची गुणवत्ता आणखी उंचावण्यासाठी शिक्षकांची संख्या वाढविणे, ग्रंथालये अधिक सक्षम करणे तसेच विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, असेही आमदार शंकर जगताप म्हणाले. विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासातच प्रगती करून चालणार नाही, तर खेळ, कला आणि इतर उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. निरोगी शरीरातच निरोगी मन वसत असल्याने विद्यार्थ्यांनी आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. घरगुती आणि पोषक आहार घेण्याची सवय लावावी, नियमित व्यायाम व खेळ यांना प्राधान्य द्यावे. शिक्षणासोबतच चांगले आरोग्य आणि सुदृढ व्यक्तिमत्त्व हे यशस्वी आयुष्याचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत, असे देखील आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, शिक्षण क्षेत्रात गेल्या काही वर्षांत मोठे बदल झाले आहेत. पूर्वीच्या शिक्षण पद्धतीच्या तुलनेत आजची शिक्षण व्यवस्था अधिक आधुनिक, तंत्रज्ञानाधारित आणि विद्यार्थी केंद्रित झाली आहे. विद्यार्थ्यांना आता दर्जेदार शैक्षणिक सुविधा, डिजिटल साधने, प्रयोगशाळा तसेच विविध विषयांवरील समृद्ध पुस्तके उपलब्ध होत आहेत. या सर्व सुविधांचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी स्वतः चा सर्वांगीण विकास साधावा. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासासोबतच खेळ, कला, विज्ञान आणि इतर विविध क्षेत्रांमध्येही सक्रिय सहभाग घ्यावा. शिक्षणाचा उद्देश केवळ गुण मिळविणे नसून व्यक्तिमत्त्व विकास घडविणे हा देखील आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःमधील क्षमता ओळखून ती विकसित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत, असेही आयुक्त डॉ. सूर्यवंशी म्हणाले.

अभ्यास करताना किंवा नवीन गोष्टी शिकताना कोणतीही शंका निर्माण झाल्यास ती शिक्षकांना विचारण्यास अजिबात संकोच करू नये. शिक्षक हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि त्यांच्या शंका दूर करण्यासाठीच असतात. कोणाला काय वाटेल याचा विचार न करता जिज्ञासू वृत्ती जोपासणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी प्रश्न विचारण्याची सवय लावतात आणि त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतात, तेच आयुष्यात पुढे जाऊन यशस्वी होतात, असे देखील आयुक्त डॉ. सूर्यवंशी यावेळी म्हणाले.

यावेळी आमदार शंकर जगताप आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश तसेच इतर शालेय साहित्य वाटप करण्यात आले. याशिवाय त्यांनी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधला तसेच शाळेमध्ये आवश्यक असलेल्या सोयीसुविधा किंवा सुधारणा याबाबत सविस्तर चर्चा केली.

**अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम,विक्रांत बगाडे यांनी देखील केले विद्यार्थ्यांचे स्वागत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पी. सी. एम. सी. पब्लिक स्कूल,श्रीमती लीलाबाई क्रांतीलाल खिंवसरा मोहननगर मुले शाळा,थेरगाव शाळांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीमध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश तसेच खाऊ वाटप करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, नगरसदस्या अरुणा लंगोटे, वैशाली काळभोर, उप आयुक्त संदीप खोत, तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी नव्या शैक्षणिक वर्षाचा आनंद उत्साहात साजरा केला.

यावेळी आई वडील व शिक्षक जे सांगतात ते सर्व विद्यार्थ्यांनी ऐकले तर आयुष्यात तेच विद्यार्थी चांगले नागरिक म्हणून घडतात, असे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सांगितले तर अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत चांगले संस्कार, शिस्त आणि जबाबदारीचे महत्त्व देखील समजावून सांगितले.

## १० लाखांच्या खंडणीसाठी १४ वर्षीय वेदांतची गोळ्या झाडून हत्या; मुख्य आरोपी जेरबंद

**सांगली । प्रतिनिधी**

सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील धक्कादायक घटना घडली आहे. आरग येथील रेल्वेच्या मालधक्केतील ठेकेदारी आणि १० लाखाच्या खंडणीच्या वादातून हमाल नेते बाळासाहेब बंडगर यांचा नातू वेदांत बंडगर या १४ वर्षीय मुलाच्या डोक्यात गोळी घालून हत्या करण्यात आली होती. निलेश गडदे नामक सराईत गुन्हेगाराने त्याच्या साथीदारांच्या मदतीने हा खून केल्याचे आता तपासात समोर आले आहे. या प्रकरणी गेल्या चार दिवसापासून पसार झालेला कुख्यात गुंड निलेश गडदेला अखेर जेरबंद केलं आहे.

सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पथकाने कर्नाटक सीमेवर कारवाई केली आहे. इतर तीन साथीदार अद्यापही पसारच आहेत. निलेश दडगे यांने गुरुवारी रात्री १४ वर्षाच्या वेदांत बंडगर याचा डोळ्यात गोळी झाडून खून केला होता. मालधक्क्यातील ठेकेदार बाळू बंडगर आणि त्याचा साथीदार लक्ष्मण खरातकडे संशयित हल्लेखोर निलेश गडदेने आरग येथील रेल्वेची मालधक्क्यावरील ठेका द्यावा किंवा १० लाख रुपये खंडणी द्यावी, अशी लक्ष्मण खरात याचा घरात घुसून मागणी केली होती. याबाबतची तक्रार देण्यासाठी बाळू बंडगर त्यांचा मुलगा मारुती बंडगर आणि लक्ष्मण खरात हे तिघेही जत पोलीस ठाण्यात गेले होते. याचा राग मनात धरून निलेश गडदे व त्याच्या साथीदारांनी बाळू बंडगर यांचा नातू वेदांत बंडगर याच्या डोक्यामध्ये गोळी झाडून त्याचा निर्घृणपणे खून केल्याची माहिती मिळाली आहे.

प्राथमिक तपासात माथाडी कामगारांमधील जुन्या वादातून ही घटना घडल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास सुरू असून आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. अल्पवयीन मुलाची घरात घुसून हत्या झाल्याने सांगली शहरात खळबळ उडाली असून या घटनेमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरम्यान ज्या मालधक्क्याच्या वादातून सुरुवात झाली, त्या लक्ष्मण खरात यांच्या घरात घुसून सराईत गुन्हेगार निलेश गडदे याने धमकी दिली होती. आरग येथील मालधक्क्यावरील ठेका सोडावा, अन्यथा १० लाख रुपयांची खंडणी द्यावी, अशी मागणी त्याने केली होती. तसेच पैसे न दिल्यास मारून टाकण्याची धमकीही पत्नी आणि मुलांसमोर दिल्याची तक्रार लक्ष्मण खरात यांनी पोलिसात केली आहे.

## जि .प. उच्च प्राथमिकशाळा हेलस येथे प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

**हेलस । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी जि.प. उच्च प्राथमिक शाळा हेलस येथे प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे वाजत-गाजत मिरवणूक काढून गुलाबपुष्प देत स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या पाऊल व अंगठ्याचे ठसे घेऊन त्यांचा शाळेत प्रवेश संस्मरणीय करण्यात आला.



या कार्यक्रमास मा. सुमन मोरे (तहसीलदार, मंठा), मा. दत्ता क्षीरसागर (गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती मंठा), मा. शिवाजी देशमुख, श्री. आर. बी. कुडे (मुख्याध्यापक), सौ. गुंफाबाई बन्सोडे (सरपंच, हेलस), शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व सदस्य, शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

तहसीलदार सौ. सुमन मोरे यांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक विद्यार्थ्याने एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे, असे आवाहन केले. गटशिक्षणाधिकारी श्री. दत्ता क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण शिक्षण घ्यावे तसेच गावकऱ्यांनी शाळेच्या प्रगतीसाठी सहकार्य करावे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक श्री. आर. बी. कुडे यांनी उपस्थित मान्यवर, पालक व ग्रामस्थांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षक व शिक्षीकांनी मोलाचे सहकार्य केले. या मध्ये खनके, जामदा , गडधे , जोशी, बुधवंत, आघव, झाटे, गायकवाड, कोकाटे यां सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# महापालिका सर्वसाधारण सभेत पंडित डॉ. नंदकिशोर कपोते यांचा महापौरांच्या हस्ते मानपत्र देऊन सन्मान

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कलाकारांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सुरू केलेला उपक्रम अतिशय स्तुत्य आहे. आपल्या शहरामध्ये विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणारे अनेक गुणी कलाकार आहेत.

अनेकदा अशा कलाकारांचे योगदान समाजापर्यंत पुरेशा प्रमाणात पोहोचत नाही किंवा त्यांना योग्य वेळी प्रोत्साहन मिळत नाही. अशा परिस्थितीत कलाकारांचा शोध घेऊन त्यांचा सन्मान करण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहे. अशा उपक्रमांमुळे कलाकारांना नवसंजीवनी मिळते, तसेच युवा पिढीलाही कलेच्या क्षेत्रात पुढे जाण्याची प्रेरणा मिळते, असे मत आंतरराष्ट्रीय कीर्तिचे कथक नर्तक पंडित डॉ. नंदकिशोर कपोते यांनी व्यक्त केले.



पिंपरी चिंचवड शहराच्या नावलौकिकात आपल्या कार्यकर्तृत्वाने मोलाची भर घालणाऱ्या तसेच कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सन्मान करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्या धोरणानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत आंतरराष्ट्रीय कीर्तिचे कथक नर्तक डॉ. पंडित नंदकिशोर कपोते यांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला, त्यावेळी मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते.

यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नगरसदस्य अनिल घोलप, अर्चना करांडे, सुलभा उबाळे, प्रा. उत्तम केंदळे, शत्रुघ्न काटे, योगेश बहल, नगरसचिव मुकेश कोळप, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना पंडित डॉ. नंदकिशोर कपोते म्हणाले, माझे संपूर्ण बालपण पिंपरी चिंचवडमध्येच गेले. येथील शाळांमध्ये शिक्षण घेत असताना माझ्यामध्ये कलेची आवड निर्माण झाली. विशेषतः नृत्यकलेबद्दल मला लहानपणापासूनच आकर्षण होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज करण्यात आलेला हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा आणि भावनिक क्षण आहे. ज्या शहरात माझे बालपण गेले, ज्या मातीत मी वाढलो, शिकलो आणि घडलो, त्या पिंपरी चिंचवड शहराकडून मिळालेला हा सन्मान माझ्यासाठी सर्वांत मोठा आणि मोलाचा आहे. यावेळी मानपत्राचे वाचन विशेष अधिकारी किरण गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

### पिंपरी चिंचवडच्या सांस्कृतिक वैभवाला राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय उंची देणारे कलासाधक

डॉ. पंडित नंदकिशोर कपोते यांनी कथक नृत्यकलेच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीची मूल्ये जपत पिंपरी चिंचवडच्या सांस्कृतिक विश्वाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख प्राप्त करून देण्यासाठी अत्यंत उल्लेखनीय योगदान दिले आहे. भारतीय शास्त्रीय नृत्यपरंपरेतील कथक या अभिजात, समृद्ध आणि तेजस्वी कलावैभवाला आपल्या अद्वितीय प्रतिभा, कठोर साधना आणि संस्कृतीनिष्ठ कार्यातून जागतिक स्तरावर प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे ज्येष्ठ कथक नर्तक, गुरु, संशोधक, लेखक, विचारवंत आणि संस्कृतीचे अभ्यासक म्हणून डॉ. पंडित नंदकिशोर कपोते यांनी भारतीय कला विश्वात अढळ स्थान निर्माण केले आहे. भारत सरकारच्या सांस्कृतिक विभागाची राष्ट्रीय शिष्यवृत्ती प्राप्त करणारे महाराष्ट्रातील पहिले पुरुष कथक नर्तक म्हणून डॉ.कपोते यांनी मानाचे शिखर सर केले. कथक नृत्यकलेतील त्यांच्या असामान्य योगदानाची दखल घेत भारत सरकारने त्यांना संगीत नाटक अकादमी राष्ट्रीय पुरस्कार या प्रतिष्ठित राष्ट्रीय सन्मानाने गौरवान्वित केले आहे. याशिवाय पुणे आणि निगडी येथे स्थापन केलेल्या नंदकिशोर कल्चरल सोसायटीच्या माध्यमातून डॉ.कपोते यांनी कथक नृत्याचे शिक्षण, संवर्धन आणि प्रचार-प्रसाराचे कार्य सुरू ठेवले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### परभणी जिल्ह्यात पहिल्याच दिवशी शाळेला ठोकले कुलूप तर अनेक शाळेत 'शाळा प्रवेशोत्सव'

**परभणी । प्रतिनिधी**

मानवत तालुक्यातील कोल्हा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत मुख्याध्यापकांच्या कथित सततच्या गैरहजेरीमुळे आणि प्रतिनियुक्तीवर असलेले शिक्षक शाळेत रुजू न झाल्याच्या निषेधार्थ संतप्त पालकांनी व शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी १५ जुन २०२६ रोजी शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळेला कुलूप ठोकून आंदोलन केले.या शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. या शाळेत सुमारे १४८ विद्यार्थी शिक्षण घेत असून मुख्याध्यापकांसह पाच शिक्षकांची पदे मंजूर आहेत. मात्र, गेल्या वर्षभरापासून मुख्याध्यापक नियमितपणे शाळेत उपस्थित राहत नसल्याचा आरोप पालकांनी केला आहे. तसेच प्रतिनियुक्तीवर असलेले एक शिक्षकही शाळेत कार्यरत नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाल्याची तक्रार करण्यात आली व प्रवेशद्वाराला कुलूप ठोकत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. तर मानवत येथील पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत १५ जुन पासून पासून नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ

प्रवेशोत्सवाने करण्यात आला.

शाळेच्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीतील नवीन प्रवेशित विद्यार्थी व पालकांचे गुलाब पुष्प, शैक्षणिक साहित्य, खाऊ, शाळा गणवेश देऊन स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमास परभणी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा परिषदेच्या शिक्षण सभापती वैशाली पंकजराव आंबेगावकर, मानवत नगर परिषदेच्या नगराध्यक्षा राणी अंकुश लाड, नगरसेवक मोहन लाड, मुख्याधिकारी कोमल सावरे, पंचायत समितीचे उपसभापती सुरज काकडे, लक्षण शिंदे तसेच शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा राणी गोलाईत, उपाध्यक्ष विलास बारहाते, सदस्य श्रीराम पकवाने, रामभाऊ गोलाईत, उत्तम गायकवाड उपस्थित होते. शाळेच्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीतील नवीन प्रवेशित विद्यार्थी व पालकांचे स्वागत जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापक माणिक घाटूळ यांनी प्रस्ताविक केले. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी मुलांच्या शिक्षणात पालकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. शाळेच्या वतीने आलेल्या मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश पवार यांनी केले तर सोनव्या कीर्तनकार यांनी आभार मानले.

### काँग्रेसमध्ये नवा वाद; १६ नगरसेवक गटनेतेविरोधात

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जानेवारी महिन्यात राज्यात महानगर पालिकेच्या निवडणुका पार पडल्या. यात बहुतांश ठिकाणी महायुतीला घवघवीत यश मिळालं. अपवाद फक्त विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्याचा. चंद्रपूर महानगरपालिकेत सर्वात जास्त जागा जिंकून काँग्रेस मोठा पक्ष ठरला. ६६ सदस्यांच्या चंद्रपूर महानगर पालिकेत काँग्रेसने सर्वाधिक २७, भाजपने २३, उद्धव सेनेने ६, शेकापने ३, वंचित २, अपक्ष २ आणि अन्यांनी एक-एक जागा जिंकली. महाविकास आघाडीत काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गट एकत्र असल्याने काँग्रेसला स्वत:चा महापौर बसवण्याची संधी होती. पण चंद्रपूरात नगरसेवक निवडून आले, त्या दिवसापासून काँग्रेसमध्ये अंतर्गत गटबाजीने जोर धरला. खासदार प्रतिभा धानोरकर आणि आमदार विजय वडेट्टीवार या दोन गटांमध्ये नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांची विभागणी झाली.

परिणामी महापौर पदाच्या निवडणुकीत भाजपच्या संगीता खांडेकर यांनी अवघ्या एकामताने बाजी मारली. त्यांनी काँग्रेसच्या सोनाली महाडूळे यांचा अवघ्या एक मताच्या फरकाने पराभव केला. काँग्रेसला संधी असूनही महापौर पद मिळवता आलं नाही. त्यानंतर आताही धानोरकर गट विरुद्ध वडेट्टीवार गट संघर्ष मिटलेला नाही. चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसमधील अंतर्गत वाद विकोपाला गेला आहे धानोरकर गटाचे नगरसेवक वेगळा गट स्थापन करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयात पोहोचणार आहेत.

# सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन हा राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या दिव्यांग कलाकार

## गायिका अबोली जरीत यांचा पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत राष्ट्रपती पदक विजेत्या सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन तसेच इंडियन आयडॉल फेम अबोली जरीत यांचा सन्मान महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आला.



यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे,माजी महापौर योगेश बहल,नगरसदस्य शत्रुघ्न काटे,अनिल घोलप, अर्चना करांडे, सुलभा उबाळे, प्रा. उत्तम केंदळे, माजी नगरसदस्या गिरीजा कुदळे, नगरसचिव मुकेश कोळप, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

याप्रसंगी अबोली जरीत म्हणाल्या, आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने झालेल्या या सन्मानामुळे मला अत्यंत आनंद होत आहे. या शहरात येण्याची आणि येथील विविध उपक्रमांची माहिती जाणून घेण्याची संधी मिळाली, याचा मला विशेष आनंद आहे. पिंपरी चिंचवडमध्ये आल्यानंतर मला दिव्यांग भवनला भेट देण्याची संधी मिळाली. हे दिव्यांग भवन पाहून मी खरोखरच भारावून गेले. इतक्या सर्वसमावेशक पद्धतीने उभारण्यात आलेले आणि दिव्यांग बांधवांच्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेले असे दिव्यांग भवन मी यापूर्वी कधीही पाहिले नव्हते. भारतातील पहिले दिव्यांग भवन पाहण्याचा अनुभव माझ्यासाठी अतिशय प्रेरणादायी ठरला,येथे आल्यावर मला असे अजिबात वाटले नाही की मी पहिल्यांदाच या शहरात आले आहे.

माझ्या आयुष्यात अनेक चढ उतार आले. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात काही ना काही अडचणी, संकटे आणि आव्हाने येत असतात. मात्र अशा परिस्थितीत खचून न जाता, स्वत:वर विश्वास ठेवून पुढे जात राहणे खूप महत्त्वाचे असते. आयुष्यात कितीही कठीण प्रसंग आले तरी हार मानायची नाही, हे मी स्वत:ला नेहमी सांगत आले आहे. संघर्ष हा यशाच्या अडचणींपासून पळून न जाता त्यांचा सामना केल्यास त्यातून नवे मार्ग आणि नवी संधी निर्माण होत असते. त्यामुळे प्रत्येकाने आत्मविश्वासाने पुढे जात राहावे, स्वत:च्या स्वप्नांवर विश्वास ठेवावा आणि कोणत्याही परिस्थितीत आशा सोडू नये, असेही मत अबोली जरीत यांनी व्यक्त केले.

## सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय निवासी शाळेमध्ये प्रवेशोत्सव साजरा



**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, जालना, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलांची शासकीय निवासी शाळा, बदनापुर, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलांची शासकीय निवासी शाळा, भोकरदन अशा एकुण ३ शासकीय निवासी शाळा कार्यान्वीत आहेत.

आज दि.१५ जुन,२०२६ रोजी जालना जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, जालना व अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलांची शासकीय निवासी शाळा, बदनापुर, भोकरदन येथे प्रवेशात्सव साजरा करण्यात आला.अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, जालना येथील शाळेमधील प्रवेशित मुलींनी प्रवेशोत्सव निमित्त शालेय पुस्ताकांचे व मोबाईल टॅबचे वाटप करण्यात आले आहे.

सदर प्रवेशात्सवा दरम्यान विशेष अधिकारी (शा.नि.शा.),डॉ. अनिता राठोड, समाजकल्याण, स्नेहल मोदाळे, संदिप कांबळे, मुख्याध्यापिका, सुर्यकला गोसावी, अधिक्षका भावना चौधरी तसेच शासकीय निवासी शाळेतील सर्व सहाय्यक शिक्षक उपस्थित होते.




## पल्स पोलिओ, स्टॉप डायरिया मोहिम यशस्वी करा : जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय पल्स पोलिओ मोहिमेची सभा जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनामध्ये संपन्न झाली. पल्स पोलिओ मोहिमेसाठी सुक्ष्मकृती आराखडयाचे काटेकोरपणे पालन करुन एकही ० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक पल्स पोलिओ मधुन वंचित राहणार नाही असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. पल्स पोलिओ मोहिम अंतर्गत जालना जिल्हयातील ० ते ५ वयोगटातील २ लक्ष ५३ हजार बालकांना पोलिओची मात्रा रविवार, २८ जुन रोजी देण्यात येणार असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे यांनी सांगितले.



स्टॉप डायरिया मोहिम अंतर्गत ५ वर्षाखालील बालकांना ओ.आर.एस. व झिंक टॅबलेट घरोघरी जाऊन देण्यात येणार आहे. यामध्ये ओ.आर.टी.कॉर्नर स्थापन करण्याचे निर्देश मा.जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे यांनी पल्स पोलिओ, स्टॉप डायरिया, एच.पी.व्ही. लसीकरण, गोवर व रुबेला दुरीकरण मोहिम विषयी माहिती दिली.

एच.पी.व्ही.लसीकरण वाढविणे त्यासाठी शाळांना भेटी देणे. ई-संजीवनी ओ.पी.डी. वाढविणे. महात्मा फुले जन आरोग्य योजनांचा लाभ ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी द्यावा. रुग्णांना चांगली आरोग्य सेवा देऊन रेफर करणे शक्यतो टाळावे. आपल्या आरोग्य संस्था नियमित स्वच्छ असाव्यात. तालुका आरोग्य अधिकारी यांनी आपल्या पी.एच.सी.ला नियमित भेटी देऊन सर्व आरोग्य उपक्रमांचा आढावा घेऊन स्वच्छता पाहणी करण्याचे निर्देश दिले.

यावेळी डॉ.जयश्री भुसारे जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ.राजेंद्र पाटील जिल्हा शल्य चिकीत्सक, डॉ.तरुणा छाबडा अध्यक्ष इंडियन असोसिएशन ऑफ पीड्रीयाट्रिक, डॉ.बळीराम बागल अध्यक्ष आयएमए, डॉ. शुंभागी मिसाळ प्रपाठक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय डॉ.श्रीकांत देसाई माता बाल संगोपन अधिकारी, डॉ.एन.जी.पवार साथरोग अधिकारी, वैद्यकिय अधिक्षक, तालुका आरोग्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# एकल महिला धोरणासाठी शासनाकडून सूचना मागविण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासन स्वतंत्र एकल महिला धोरण तयार करीत असून हे धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि परिणामकारक करण्यासाठी राज्यभरातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, संशोधक आणि विषयतज्ञ यांच्याकडून सूचना व अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

महिला व बाल विकास विभागामार्फत तयार करण्यात येत असलेल्या या धोरणाच्या माध्यमातून एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व कायदेशीर सक्षमीकरणासाठी विविध उपाययोजनांचा विचार करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने सर्व संबंधित घटकांना धोरण निर्मिती प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले आहे.



याकरीता आपल्या सूचना शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी ८२०८५८९१९५ या अधिकृत व्हॉट्सॲप क्रमांकावर आपले अभिप्राय पाठवावेत. केवळ एकल महिलांच्या समस्या मांडण्याऐवजी त्या समस्यांवर शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना कराव्यात, कोणत्या नवीन योजना सुरू कराव्यात, विद्यमान योजनांमध्ये कोणते बदल आवश्यक आहेत, तसेच गरज भासल्यास कोणत्या कायदे किंवा नियमांमध्ये सुधारणा करण्यात याव्यात याबाबत सविस्तर सूचना पाठवाव्यात. सूचना पाठविताना केवळ त्रोटक मते न देता संबंधित विषयाची पार्श्वभूमी, प्रस्तावित उपाययोजना, संभाव्य लाभार्थी, अपेक्षित परिणाम तसेच धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक बाबींचा समावेश असलेले सविस्तर प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्राप्त होणाऱ्या सूचना व अभिप्रायांचा एकल महिला धोरणाचा मसुदा तयार करताना योग्य तो विचार करण्यात येणार असल्याचे महिला व बाल विकास विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्यातील सर्व नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक व विषयतज्ञ यांनी या महत्त्वपूर्ण उपक्रमात सहभागी होऊन शासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास कल्याण अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# धर्मवीर छावा संघटनेचा आमदार रोहितदादा पवार यांच्या आंदोलनास जाहीर पाठिंबा

**जालना । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या अटी व शर्थी शिथिल करण्यात याव्यात तसेच अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळावा, या प्रमुख मागणीसाठी आमदार मा. रोहितदादा पवार यांनी श्रीक्षेत्र पंढरपूर, तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथे सुरू केलेल्या आंदोलनास धर्मवीर छावा संघटनेच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. राज्यातील शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत असून, कर्जमाफीच्या कठोर अटींमुळे अनेक गरजू शेतकरी लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे शासनाने कर्जमाफीच्या निकषांमध्ये तातडीने शिथिलता आणून सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी धर्मवीर छावा संघटनेने केली आहे.



शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू असलेल्या या आंदोलनाला संघटनेचा पूर्ण पाठिंबा असून, शासनाने शेतकरीहिताचे निर्णय तात्काळ घ्यावेत, असे आवाहन धर्मवीर छावा संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.शेतकरी गोरगरीब कष्टकरी कामगार हिताच्या मुद्द्यावर धर्मवीर छावा संघटना सदैव आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील असे आश्वासन संस्थापक अध्यक्ष गणेश उगले पाटील यांनी रोहित पवार यांना दिले.

निवेदन स्विकारतांना आमदार रोहित दादा पवार,खासदार निलेश लंके साहेब.

यावेळी धर्मवीर छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा.गणेश उगले पाटील, मराठवाडा अध्यक्ष शेतकरी आघाडी सूर्यप्रकाश जाधव,जिल्हा संपर्कप्रमुख छत्रपती संभाजीनगर सतीश देवखळे पाटील, जिल्हाउपाध्यक्ष जालना.मा.लक्ष्मण गाडेकर आदी पदाधीकारी उपस्थित होते.

# दहावी-बारावी पुरवणी परीक्षांसाठी जालना जिल्ह्यात कलम १६३ लागू

## परीक्षा केंद्रे व परिरक्षक केंद्रांच्या ५०० मीटर परिसरात ध्वनीक्षेपक, झेरॉक्स व एसटीडी बूथ बंद राहणार

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जून-जुलै २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) पुरवणी परीक्षा सुरळीत, शांततापूर्ण आणि गैरप्रकारमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जालना जिल्ह्यातील परीक्षा केंद्रे व परिरक्षक केंद्रांच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

अपर जिल्हादंडाधिकारी, जालना यांनी जारी केलेल्या आदेशानुसार इयत्ता १० वीची परीक्षा दि. १६ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील आठ परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात येणार आहे. यात नूतन विद्यालय, जालना, राष्ट्रीय हिंदी विद्यालय (इंग्रजी माध्यम), जालना, समर्थ विद्यालय, अंबड, कै. दत्तासाहेब देशमुख हायस्कूल, घनसावंगी, जिल्हा परिषद प्रशाला भोकरदन, जिल्हा परिषद हायस्कूल जाफ्राबाद, श्री योगानंद माध्यमिक विद्यालय परतूर आणि स्वामी विवेकानंद विद्यालय, मंठा या केंद्रांचा समावेश आहे.

तसेच इयत्ता १२ वीची परीक्षा देखील दि. १६ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील सहा परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. यामध्ये जे.ई.एस. कॉलेज, जालना, मत्स्योदरी कला व वाणिज्य महाविद्यालय, अंबड, लाल बहादूर शास्त्री कनिष्ठ महाविद्यालय, परतूर, स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, मंठा, रेणुका कनिष्ठ महाविद्यालय, मंठा आणि श्री रामेश्वर आर्ट्स, कॉमर्स व कनिष्ठ महाविद्यालय, भोकरदन या केंद्रांचा समावेश आहे.

परीक्षांच्या सुरक्षित व शिस्तबद्ध आयोजनासाठी जिल्ह्यात सहा परिरक्षक केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. त्यामध्ये जिल्हा परिषद मुलांची प्रशाला, जालना, जिल्हा परिषद प्रशाला हायस्कूल, अंबड, गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती भोकरदन, जिल्हा परिषद हायस्कूल, परतूर आणि जिल्हा परिषद हायस्कूल, मंठा यांचा समावेश आहे.

परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रे व परिरक्षक केंद्रांच्या परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन या सर्व केंद्रांच्या ५०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. आदेशानुसार सर्व सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी बूथ, फॅक्स केंद्रे, झेरॉक्स केंद्रे तसेच ध्वनीक्षेपकांचा वापर बंद ठेवण्यात येणार आहे.

अपर जिल्हादंडाधिकाऱ्यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून हा आदेश जारी केला आहे. परीक्षा सुरळीतपणे पार पडावी तसेच आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध नसल्याने बीएनएसएस कलम १६३ (२) अन्वये हा आदेश एकतर्फी स्वरूपात काढण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक, जालना यांच्यामार्फत या आदेशाची ध्वनिक्षेपकाद्वारे प्रसिद्धी करण्यात येणार असून, परीक्षा दिवसांमध्ये सकाळी ८.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत हा आदेश प्रभावी राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्हा प्रशासनाने विद्यार्थी, पालक, नागरिक आणि संबंधित व्यावसायिकांनी आदेशाचे पालन करून परीक्षा प्रक्रियेस सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - MHMAR/25/A1224

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224